# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** उस्मान नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/01/2026 01:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 29/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2026
**Time From (वेळेपासून):** 15:52 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/01/2026 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/01/2026 01:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** केद्रीय जिल्हा परिषद शाळा,मूख्याध्यापक यांच्या कक्षात,उस्मानगर ता कंधार जि नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रसुल बशीरसाब तांबोळी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ए सी बी नांदेड ,नांदेड ,उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ए सी बी नांदेड ,नांदेड ,उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9987335769

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विद्या बळवंतराव वांगे | | वडील का नाम : बळवंतराव | 1. समतानगर रोड, पावडेवाडी नाका नांदेड ,नांदेड ,शिवाजी नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रामेश्वर शामराव पांडागळे | | वडील का नाम : शामराव पांडागळे | 1. शंकरनगरी-2, भगतसिंग चौक, विष्णूपूरी रोड, असरजन, नांदेड, नांदेड,उस्मान नगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |
| 3 | गौतम जयवंतराव सोनकांबळे | | वडील का नाम : जयवंतराव सोनकांबळे | 1. हडको नविन नांदेड , नांदेड , उस्मान नगर,नांदेड,महाराष्ट्र, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1200 | 1,200.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,200.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 29/01/2026

मी रसुल बशीरसाब तांबोळी, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9987335769

सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महिन्यापासुन पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.

आम्ही दि. 27/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रषांत पवार सो, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी तक्रारदार अनिरूध्द मधुकरराव सिरसाळकर, रा. पावडेवाडी नांदेड, मुळ गाव उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

त्यावरून आम्ही तक्रारदार श्री अनिरूध्द मधुकरराव सिरसाळकर यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार श्री अनिरूध्द मधुकरराव सिरसाळकर यांनी कळविले की, मी यापूर्वी सन 2019 पासून माहे सप्टेंबर 2025 पर्यंत जिल्हा परिषद कन्या शाळा, उस्माननगर, ता. कंधार, जि. नांदेड येथे विषय शिक्षक म्हणून कार्यरत होतो. तसेच माझे सोबत माझी पत्नी नामे सौ. मंजुशा नारायणराव देशमुख ही पण शिक्षिका म्हणून त्याच ठिकाणी कार्यरत होती. माहे ऑगस्ट 2025 मध्ये माझी व माझे पत्नीची विनंती बदली ऑनलाईन पध्दतीने जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर येथून झाल्याने सध्याला मी पंचायत समिती, लोहा व माझी पत्नी जि.प. शाळा बोरगाव किवळा, ता. लोहा या ठिकाणी कार्यरत आहोत.

मला व माझी पत्नी सौ. मंजुशा देशमुख यांना सन 2025-2026 चे आयकर रिटर्न विवरणपत्र भरण्यासाठी पगाराचे विवरण पत्रक लागत असल्याने त्यांनी काल दिनांक 26/01/2026 रोजी संध्याकाळी अंदाजे आठ वाजताचे सुमारास जिल्हा परीषद शाळा उस्माननगर येथील मुख्याध्यापिका सौ. विद्या वांगे यांचे मोबाईल क्रमांक 8830157592 वर कॉल केला असता त्यांनी दोघांचे पगाराचे स्टेटमेंट देण्याकरीता प्रत्येकी 600/- रूपये प्रमाणे 1200/- रूपये द्याव लागतील असे म्हणुन मला पैशाची मागणी केली आहे. तसेच मुख्याध्यापिका सौ. विद्या वांगे यांना भेटायला दिनांक 29/01/2026 रोजी जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझे व पत्नीचे माहे मार्च 2025 ते माहे सप्टेंबर 2025 पर्यंतचे पगाराचे विवरणपत्र देण्यासाठी 1200/- रूपयाची लाचेची मागणी करून स्वतः किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार असल्याचे सांगीतले.

तक्रारदार अनिरूध्द मधुकरराव सिरसाळकर, वय 56 वर्शे, व्यवसाय- शिक्षक, रा. पावडेवाडी नांदेड, मुळ गाव उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड यांचेकडुन त्यांचे सांगणे प्रमाणे त्यांचे हस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन घेतली. तसेच त्यांना गोपनियता राखण्याच्या सूचना देवुन दिनांक 29/01/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता ला.प्र.वि.

कार्यालय, नांदेड येथे येण्यास सांगितले.

प्राप्त तक्रारी प्रमाणे लाचमागणी पडताळणी करुन सापळा कार्यवाही कामी दोन शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने दिनांक 27/01/2026 रोजी मा. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नांदेड यांना पत्र देवुन सापळा कार्यवाही कामी दोन पंच उपलब्ध करुन देण्यास विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी 1) संजय ग्यानोबा देवकते, वय 53 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- कनिष्ठ लिपिक, नेमणुक जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रूग्णालय, नांदेड, 2) धोंडिबा संभाजी दुरपडे वय 52 वर्ष, व्यवसाय- नौकरी, पद- कनिष्ट लिपिक, नेमणुक जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रूग्णालय, नांदेड असे दोन शासकीय कर्मचारी पंच उपलब्ध करून दिले. त्यानंतर सदर पंचास आमचेकडे एक तक्रारदार यांनी एका लोकसेवका विरुध्द लाचमागणी बाबत तक्रार दिली आहे. प्राप्त तक्रारी प्रमाणे तक्रारदार हे त्यांचे तक्रारी संबंधीत लोकसेवक यांना भेटण्यासाठी दिनांक 29/01/2026 रोजी भेटण्यास जाणार आहेत असे सांगुन त्यांना आमचे संपर्कात राहुन दिनांक 29/01/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता ला.प्र.वि. नांदेड येथे आमचे समक्ष हजर राहण्यास सांगुन त्यांना गोपनियता राखण्याची सूचना दिली.

तक्रारदार अनिरूध्द मधुकरराव सिरसाळकर हे दिनांक 29/01/2026 रोजी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे लोकसेवक यांची भेट घेवुन लाच मागणी पडताळणी कामी सकाळी 09.30 वाजता आमचे कक्षात हजर आले. तसेच पंच 1) संजय ग्यानोबा देवकते व पंच क्र. 2 धोंडिबा संभाजी दुरपडे सूचने प्रमाणे सकाळी 09.30 वाजता ला.प्र.वि. कार्यालयात आमचे समक्ष हजर आले. तेव्हा तक्रारदार व दोन्ही पंच यांचा एकमेकांना परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी आमचेकडे दिनांक 27/01/2026 रोजी दिलेली त्यांची हस्तलिखीत तक्रार दोन्ही पंचास वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी तक्रारदार श्री.अनिरुध्द सिरसाळकर यांनी तोंडी कथन केलेली तक्रार व त्यांची हस्तलिखीत तक्रार सारखी असल्याची खात्री केली. त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे उस्माननगर येथे येवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही कामी आवश्यक साहित्यासह 12.15 वाजता सर्व सापळा पथक शासकीय वाहन तसेच तक्रारदार हे त्यांचे खाजगी कारने शासकीय वाहनाचे पाठोपाठ सोनखेड, कलंबर मार्गे उस्मानगर जवळील कलंबर रोडच्या खांडी मध्ये एका सुरक्षितस्थळी 13.10 वाजता पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. पोकाँ/3199 रापतवार यांनी आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती विद्या वांगे यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी शासकीय वाहनापासुन 13.49 वाजता पोकाँ/3199 रापतवार यांनी आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 संजय देवकते यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर येथे रवाना केले.

त्यानंतर वेळ 14.35 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 संजय देवकते हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 संजय देवकते यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली असता, सदर ठिकाणी लोकसेवक मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांना जावून भेटले व तक्रारदार यांनी विवरणपत्र आमच्या दोघांचे असे म्हणून मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांना विचारले, ''तेव्हा त्यांनी सोनकांबळे सरकडे आहे, तेव्हा तक्रारदार हे सोनकांबळे सरकडे गेले तेव्हा शिक्षक सोनकांबळे यांनी होय, बदली झालेले सहाशे,सहाशे रूपये असे म्हणाले व मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांनी आम्हाला बाराशे, बाराशे'' असे म्हणून लाचेची मागणी केल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक यांचे भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले. तरी लोकसेवक मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे, लोकसेवक शिक्षक पांडागळे यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे पत्नीचे पगार विवरण पत्र देण्यासाठी दोघांचे 600-600 मिळुन 1200/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक शिक्षक सोनकांबळे यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे आम्ही सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 1200/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या दोन व 200/- रुपये दराची एक नोट पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने चापोहेकाँ मामुलवार यांना अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्याची सुचना केली. त्याप्रमाणे त्यांनी तक्रारदार व दोन्ही पंचास अँन्थ्रासिन

पावडरचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. चापोहेकाँ मामुलवार यांनी आमचे सुचने प्रमाणे लाच रक्कमे आमचे सुचने प्रमाणे 1200/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या दोन व 200/- रुपये दराची एक नोट यास अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या उजव्या खिशात अलगद ठेवून दिले.
त्यानंतर पोकाँ/3199 रापतवार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देण्यासाठी तक्रारदार व पंच क्र.1 यांचेसह तक्रारदार यांचे कारने उस्माननगर येथील बसस्टॅन्ड पर्यत जावुन सदर ठिकाणी सापळा पथकावर नजर ठेवुन सापळा पथक पाठोपाठ आल्याची खात्री करुन व्हाईस रेकॉडर चालु करुन देण्याची सुचना देवुन त्यांना रवाना केले. आम्ही व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहनाने पाठोपाठ उस्माननगर बसस्टॅन्ड कडे रवाना झालो. त्यानंतर पोकाँ/3199 रापतवार यांनी त्यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर 15.52 वाजता चालु करुन देवुन ते तक्रारदार यांचे कारचे खाली उतरुन त्यांचे पाठोपाठ पायी निघाले. तसेच आम्ही व सापळा पथक देखील शासकीय वाहनातुन उतरुन तक्रारदार यांचे पाठोपाठ केंद्रीय जिल्हा परिषद शाळा, उस्माननगर येथे पोहचलो. तेव्हा तक्रारदार यांनी आमचे सुचने प्रमाणे सर्व सापळा पथक आजुबाजुला आल्याची खात्री करुन लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी केंद्रीय जिल्हा परिशद शाळा, उस्मानगर येथील लोकसेवक मुख्याध्यापक यांचे कक्षात गेले.

त्यानंतर तक्रारदार यांनी 15.58 वाजता लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ जिल्हा परिषदे शाळेच्या मुख्याध्यापक यांचे कक्षाचे ठिकाणी पोहचलो. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 यांना विचारले की, तक्रारदार यांचेकडे कोणी लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम कोणी स्विकारली तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगीतले की, मुख्याध्यापक यांचे कक्षात हजर असलेल्या हिरव्या रंगाची साडी परिधान केलेल्या मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे असुन त्यांनी तक्रारदार यांना पगार विवरण पत्र देण्यासाठी तक्रारदार व त्यांच्या पत्नीचे मिळुन सहाशे-सहाशे प्रमाणे 1200/- रुपये मागणी केली. तसेच तिथे हजर असलेले शिक्षक पांडागळे सर यांनी देखिल तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली आहे. तसेच तिथे हजर असलेले ईतर एक शिक्षक सोनकांबळे सर यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले असुन शिक्षक पांडागळे सर यांनी तक्रारदार श्री अनिरुध्द सिरसाळकर यांचेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारुन त्यांचे शर्टच्या छाती जवळील खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांचेकरवी लोकसेवक यांच्या खिश्यातून अँन्थ्राँसिन पावडरयुक्त 1200/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या दोन व 200/- रुपये दराची एक नोट लाचेची रक्कम काढून लोकसेवक यांचे ताब्यातून हस्तगत करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील डिजीटल व्हाँईस रेकॉर्डर बंद करून तक्रारदार यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, मी लाचेची रक्कम घेवून मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांना भेटायला जात असतांना शाळेचे गेट जवळ असतांना मला सहशिक्षक सोनकांबळे यांचा फोन आला व त्यांनी मला, ''साहेब, कुठ गेल्या हो, इतक्या वेळ वाट बघायला तुमची, मी म्हटलं विसरून गेले की काय'', त्यानंतर सहशिक्षक पांडागळे यांनी ''मोबाईलवर पैसे का टाकण'', तेव्हा तक्रारदार यांनी ''पैसे आणले की, टाकायचे कशाला, देतो बाबा'' असे म्हणाले. तेव्हा सहशिक्षक पांडागळे यांनी ''वांगे मॅडम तुमच्या हाताने घेवू वाटल घ्या'' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांना ''हे घ्या'' असे म्हणून लाचेची रक्कम 1200/- रूपये त्यांचे समोर धरली. तेव्हा मुख्याध्यापक श्रीमती विद्या वांगे यांनी ''पांडागळे सर घ्या'' असे म्हणून तक्रारदार यांना 1200/- रूपये पांडागळे सरकडे देण्याचा ईशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी ''देवू का'' असे म्हणून लाचेची रक्कम 1200/- रूपये सहशिक्षक पांडागळे यांच्यासमोर धरली असता, त्यांनी सहशिक्षक पांडागळे यांनी तक्रारदार यांच्याकडून अँन्थ्रासिनयुक्त पावडर लावलेली 1200/- रूपये लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे शर्टच्या डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर आम्हाला लाच स्विकृतीचा इशारा प्राप्त होताच आम्ही त्याठिकाणी जावून तिन्ही लोकसेवकांना ताब्यात घेतले.
त्यानंतर लोकसेवक क्र.1. श्रीमती विद्या बळवंतराव वांगे, लोकसेवक क्र.2. रामेश्वर शामराव पांडागळे, लोकसेवक क्र.3. गौतम जयवंतराव सोनकांबळे यांना 16.30 वाजता ताब्यात घेवुन सापळा पथकासह पोलीस स्टेशन उस्माननगर, ता.कंधार जि. नांदेड येथे हजर आलो.

तरी तक्रारदार श्री अनिरूदध मधुकरराव सिरसाळकर, वय-56 वर्ष व्यवसाय-शिक्षक, मुळ गाव उस्माननगर, ता. कंधार जि. नांदेड यांनी दिनांक 27/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 29/01/2026 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक क्र.1. श्रीमती विद्या बळवंतराव वांगे, वय 55 वर्ष, व्यवसाय नोकरी पद मुख्याध्यापक, नेमणुक केंद्रीय जिल्हा परिशद शाळा, उस्मानगर, ता. कंधार जि.नांदेड. रा.समतानगर रोड, शाहु महाराज पुतळया जवळ, पावडेवाडी नाका, नांदेड ता.जि.नांदेड व लोकसेवक क्र.2 रामेश्वर शामराव पांडागळे, वय 56 वर्ष, व्यवसाय नौकरी पद सहशिक्षक, नेमुणक केंद्रीय जिल्हा परिशद शाळा, उस्मानगर, ता. कंधार जि.नांदेड. रा.शंकरनगरी-2, भगतसिंग चौक, विष्णूपूरी रोड, असरजन, नांदेड ता.जि.नांदेड यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे पत्नी पगार विवरण पत्र

देण्यासाठी सहाशे-सहाशे प्रमाणे 1200/- रुपयांची मागणी केली. तसेच लोकसेवक क्र.3 गौतम जयवंतराव सोनकांबळे, वय 56 वर्ष, व्यवसाय नौकरी पद सहशिक्षक, नेमुणक केंद्रीय जिल्हा परिषद शाळा, उस्मानगर, ता. कंधार जि.नांदेड. रा.एन.डी.42, पी-2/4/3 विठठल मंदिराच्या मागे, हडको, नविन नांदेड यांनी तक्रारदार यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिले.

वेळ 15.52 ते 15.58 वाजण्याचे दरम्यान केंद्रीय जिल्हा परिशद शाळा, उस्माननगर, ता.कंधार जि.नांदेड येथील मुख्याध्यापक यांचे कक्षात लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक क्र.2 रामेश्वर पांडगळे यांनी स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी वरील तिन्ही लोकसेवक यांचेविरुध्द कलम 7, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sanjay dhondiram nilpatrevar(I (Inspector)) / psi **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sanjay dhondiram

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** psi

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**